# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून अधिसभेवर निवडून द्यावयाच्या सदस्य पदासाठी निवडणूक

## जाहीर प्रकटन

निवडणूक सूचना क्रमांक साफुपुविनि/(२८)(२)(ण)/१२३, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२ अन्वये वर उल्लेख केलेल्या निवडणुकीसाठी विहित मुदतीत प्राप्त झालेल्या उमेदवारी अर्जांची छाननी निवडणूक विभागात गुरुवार, दिनांक १० नोव्हेंबर, २०२२ रोजी करण्यात आली. नामनिर्देशन अर्जांच्या छाननीनंतर ग्राहय ठरलेल्या उमेदवारांची यादी, मा. कुलगुरू यांच्याकडे दाखल केलेल्या अपीलान्वये वैध ठरविलल्या उमेदवारांची यादी, तसेच नामनिर्देशन अर्ज मागे घेतलेल्या उमेदवारांची यादी, अशा सर्व याद्या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

१) खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त असल्यामुळे प्राचार्यांच्या गटाने त्यांच्यामधून ०५ प्राचार्य अधिसभेवर निवडून देण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या निवडणूक सुचनेनुसार रविवार, दि. २७ नोव्हेंबर, २०२२ रोजी उक्त नमूद निवडणूक सुचनेस जोडलेल्या परिशिष्टामधील मतदान केंद्रावर सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत निवडणूक घेण्यात येईल.

२) सदर निवडणूकीसाठी ज्या प्राचार्यांनी मतदानासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे मतदान केंद्र निवडले आहे. त्यांना सूचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आवारातील **पर्यावरणशास्त्र विभाग** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया समोर या ठिकाणी मतदान केंद्राचे ठिकाण निश्चित करण्यात आलेले आहे,

३) मतदाराने मतदानास येताना स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र, उदा. शासकीय/निमशासकीय सेवकांचे कार्यालयीन ओळखपत्र, आधारकार्ड, पारपत्र, वाहन चालविण्याचा परवाना (Driving Licence), किंवा सर्वसाधारण निवडणुकीसाठी सक्षम प्राधिका-यांनी दिलेले फोटोसहित ओळखपत्र किंवा आयकर विभागाने (Income Tax Dept.) दिलेले फोटोसहित ओळखपत्र (Pan Card) किंवा तत्सम फोटोसहित ओळखपत्र आणणे आवश्यक आहे. **मतदान केंद्रावरील निवडणूक अधिका-यांना वरीलपैकी एक ओळखपत्र दाखविल्याशिवाय मतदारांना मतपत्रिका मिळणार नाही.**

४) मतदान केंद्रात जे मतदार सायंकाळी ५.०० नंतर येतील त्यांना मतपत्रिका देण्यात येणार नाही.

५) मंगळवार, दि. २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी, सकाळी ८.०० वाजल्यापासून **पर्यावरणशास्त्र विभाग** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळया समोर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे – ४११ ००७ येथे मतमोजणीस सुरुवात होईल व मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात येईल. मतमोजणीच्या वेळी उमेदवार स्वतः किंवा उमेदवाराने लेखी अधिकार पत्र दिलेले त्याच मतदार यादीतील मतदार असणा-या त्यांच्या प्रतिनिधींना किमान एक तास अगोदर पूर्व सूचना देऊन ओळखपत्र दाखवून हजर राहता येईल.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/२००
दिनांक : २४/११/२०२२

(डॉ. प्रफुल्ल पवार)
कुलसचिव

**प्रत** : सर्व संबंधित.

D:\Election 2022 (Bhosale)\Principal\Prakatan.docx